MHKO050014282019

दावा दाखल तारीख	:	०१. ०४. २०१९
दावा नोंदणी तारीख	:	०४. ०४. २०१९
दावा निकाल तारीख	:	१३. ०७. २०२६
कालावधी	:	व – म –दि
		०७ – ०३ – १२

इचलकरंजी येथील दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी जी.एम. नदाफ)

विशेष दिवाणी दावा क्रं. २७/२०१९

निशाणी क्र.६०/अ

सोहनी टेक्स्टाईल्स)
प्रोप्रायटर - गोपाल सतीश खंडेलवाल)
व.व. - ३३, धंदा - व्यापार,)
रा. २१/१६९२, इचलकरंजी, ता. हातकणंगले,) **वादी**
जि. कोल्हापूर.)

विरुध्द

रोहन कुमार यळरुटे)
व.व. - २९, धंदा - व्यापार,)
रा.१७/२३९, पुजारी मळा, इचलकरंजी,) **प्रतिवादी**
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.)

हजर विधिज्ञ -

वादीतर्फे वकील - श्री. एस. व्ही. दरिबे
प्रतिवादी तर्फे वकील - श्री. पी. ए. उपाध्ये

न्यायनिर्णय
(दिनांक १३.०७.२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा दावा प्रतिवादीकडून रक्कम रुपये १२,३४,८५०/- वसूल होऊन मिळणेकरिता दाखल करणेत आला आहे.

वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-

२. वादी यांचा सोहनी टेक्सटाईल्स या नावाने इचलकरंजी येथे सुत, कापड माल खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. प्रतिवादी यांचा सुतापासुन कापड बनविणेचा व विक्री करणेचा व्यवसाय आहे. प्रतिवादी, त्यांचे बंधु, वहिनी, पुतणी, वडील व आई हे एकत्र कुटुंबातील सदस्य आहेत. त्यांचे सोयीकरिता ते वेगवेगळया नावाने युनिट दाखवुन कापड बनविणेचा व्यवसाय करत आहेत. त्यांना यळरुटे उर्फ कुरुंदवाडे या नावाने ओळखले जाते. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान तीन वर्षापासुन व्यावसायीक संबंध आहेत. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये बरेच सुत खरेदी विक्रीचे व्यवहार झालेले आहेत. त्याप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी यांचे नांवे खाते ठेवलेले आहे. प्रतिवादी यांनी खरेदी केलेल्या बिलाची रक्कम वेळेत अदा केली नाही तर त्यावर द.सा.द.शे. १८ टक्के व्याज देणेचे प्रतिवादींनी मान्य व कबुल केले होते. प्रतिवादी यांनी वादी कडून खरेदी केलेला माल केंद्रीय विक्री कर कायद्याप्रमाणे 'सी' फॉर्मवर केला असल्याने 'सी' फॉर्म देणेची जबाबदारी प्रतिवादीची आहे. त्याप्रमाणे झालेल्या व्यवहारांचे 'सी' फॉर्म विक्री कर कार्यालयात दिलेले आहेत. परंतु, 'सी' फॉर्म नं. २७०५१७१८५०६२८२ दिनांक २७.५.२०१७ रोजीचे बिल नं.८ रक्कम रुपये १,०३,२००/- व बिल नं. १०८ रक्कम रुपये ५५,२६०/- चे 'सी' फॉर्म प्रतिवादीने दिलेले नाहीत.

३. प्रतिवादी यांनी वादी यांचेकडून वेळोवेळी घेतलेल्या खरेदीतुन दिनांक १४.८.२०१७ अखेर प्रतिवादी यांचेकडून रक्कम रुपये ९,९०,९९७/- इतकी येणे बाकी आहे. त्याबाबत वादी यांनी प्रतिवादींचे कडे रक्कमेची वारंवार

मागणी केली असता प्रतिवादीने वादींना भारतीय स्टेट बँक शाखा- हातकणंगले कडील चेक नं. ४१३९६३ दिनांक १४.८.२०१७ रक्कम रुपये ५,३४,०७३/-, चेक नं. ४१३९६४ दिनांक १४.८.२०१७ रक्कम रुपये ३,३३,९७०/- व चेक नं. ४१३९६५ दिाक १४.८.२०१७ रक्कम रुपये १,२२,९५४/- असे दिले. सदरचे तीन्ही चेक बँकेत वटणेसाठी भरले असता ते 'अकाऊंट क्लोज्ड' या शे-याने दिनांक १६.८.२०१७ रोजी परत आले आहेत. त्यामुळे, वादी यांनी दिनांक ३०.८.२०१७ रोजी प्रतिवादीस वकील एस.एस. दरिबे यांचे मार्फत रक्कम मागणीची नोटीस पाठविली. सदरची नोटीस प्रतिवादी यांनी दिनांक ४.९.२०१७ रोजी स्वीकारुन देखील त्यांनी सदर नोटीसीस उत्तर दिले नाही अगर वादींची रक्कम भागविलेली नाही. प्रतिवादी हे ब-याच लोकांचे देणी लागत आहेत. प्रतिवादी नं. रोहित कुमार यळरुटे यांचेकडून रक्कम रुपये ६,७८,८९५/- व प्रतिवादी नं.२ संजीवनी कुमार यळरुटे यांचे कडून रक्कम रुपये ४,१७,६८६/- अशी एकुण रक्कम रुपये १०,९६,५८१/- येणे बाकी आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांची एकत्र कुटुंबाची नांवे इचलकरंजी येथे मिळकत रि.स.नं.५४९/३ब याचा सि.स.नं. १३९२५अ/७, प्लॉट नं.७ क्षेत्र २७६ चौ.मि. आहे. सदर मिळकतीची प्रतिवादी यांनी परस्पर विल्हेवाट लावली अगर तबदील केली तर वादीचे हुकुमानामेस कोणताच अर्थ राहणार नाही. सदर मिळकतीमध्ये प्रस्तुत प्रतिवादी यांचा १/५ हिस्सा आहे. त्यामुळे सदरची मिळकत अव्वल जप्तीने जप्त होऊन मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द चेक अनादरित झालेबाबत फौजदारी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांचे कडून रक्कम रुपये ९,९०,९९७/- व त्यावरील दिनांक १५.८.२०१८ पासुन ११.३.२०१९ पर्यंतचे व्याज व इतर खर्च असे मिळुन रक्कम रुपये १२,३४,८५०/- इतकी रक्कम वसूल होऊन मिळणेकरिता वादी यांनी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी याने निशाणी क्र.१३ कडे त्याची कैफीयत दाखल केली आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीचे दाव्यातील संपुर्ण कथने खोटी व चुकीची आहेत. सदर दावेस कोणतेही कारण घडलेने नसताना सदरचा दावा दाखल करणेत आला आहे. प्रतिवादी हे वादीचे कोणतेही देणे देय लागत नाहीत. दावा कायद्याने चालणेस पात्र नाही. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेल्या व्यवहारा पोटी वादी यांना वेळोवेळी धनादेशाद्वारे रक्कम देणेत आलेली आहे. तसेच सदर व्यवहारा दरम्यान प्रतिवादी व त्यांचे कुटुंबियांकडून वादी यांना अनावधानाने रक्कम रुपये १२,५४,७९८/- इतकी जादा अदा झालेली आहे. सदरची रक्कम परत देणेसाठी वादींकडे वारंवार मागणी करुन ही त्यांनी परत केलेली नाही. सदर रक्कमेतुन प्रतिवादी हे वादीला देय लागत असलेली रक्कम रुपये ४,४७,२९३/- इतकी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम प्रतिवादींना देणे गरजेचे असताना सदरची संपुर्ण रक्कम गिळंकृत करणेच्या हेतुने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी व्यवहारापोटी दिलेल्या को-या धनादेशाचा गैरवापर करुन वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ प्रमाणे खोटया केसीस दाखल केलेल्या आहेत. दावा मिळकत ही प्रतिवादी यांचे वाडवडिलार्जित मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यामध्ये त्यांचा सुमारे ३० ते ४० वर्षापासुन यंत्रमागाचा व्यवसाय सुरु आहे. प्रतिवादी यांनी मिळकत विक्री अगर हस्तांतरण करणेचा कोणताही प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे, वादींचा दावा खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

६. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी निशाणी क्र. ३१ कडे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसासह देत आहे -

<u>मुद्दे</u>	<u>निष्कर्ष</u>
१. वादी हे सिध्द करतात काय की, प्रतिवादी यांनी वादीकडून वेळोवेळी घेतलेल्या खरेदीतुन	**होय.**

दिनांक १४.८.२०१७ अखेर रक्कम रुपये ९,९०,९९७/- इतके येणे आहे?	
२. वादी येणे रक्कम रुपये ९,९०,९९७/- वर दिनांक १५.८.२०१७ पासुन ते दिनांक ११.३.२०१९ पर्यंत द.सा.द.शे.१८ टक्के प्रमाणे होणारे व्याज मिळणेस पात्र आहेत काय?	**होय.**
३. वादी नोटीस फी, वकील फी, टायपिंग चार्जेस इत्यादी करिता रक्कम रुपये ३०००/- मिळणेस पात्र आहेत काय?	**होय.**
४. प्रतिवादी हे सिध्द करतो काय की, वादी सोबत झालेल्या व्यवहारापोटी प्रतिवादीने वादीस जादा रक्कम अनावधानाने दिली आहे?	**नाही.**
५. प्रतिवादी नुकसान भरपाई खातर रक्कम रुपये १०,०००/- मिळणेस पात्र आहे काय?	**नाही.**
६. वादी मागणीप्रमाणे प्रतिवादीकडून रक्कम रुपये १२,३४,८५०/- व त्यावर दावा दाखल तारीख १.४.२०१९ पासुन द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याज वसुल होऊन मिळणेस पात्र आहेत काय?	**होय.**
७. हुकुमनामा व आदेश काय?	**अंतिम आदेशाप्रमाणे**

कारणमिमांसा

७. वादी यांनी दाव्याचे शाबीती करिता स्वतःचा पुरावा (वा.सा.क्र.१) नि.क्र.२७ कडे दिला आहे. तसेच वादीतर्फे साक्षीदार मनमोहन (वा.सा.क्र.२) यांची साक्ष नि.क्र.२८ कडे नोंदविली आहे. तसेच त्यांनी नि.क्र.५० कडे पुरावा बंदची पुरसीस दाखल केली आहे. याउलट, प्रतिवादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. वादीने त्याचे कथनाचे पृष्टयर्थ कागदोपत्री पुरावा दाखल केला असून त्याचा ऊहापोह योग्य त्या ठिकाणी करणेत येत आहे.

मुद्दे क्रमांक १ ते ६ बाबत -

८. साक्षीदार क्र.१ गोपाल यांचे पुराव्यात असे आले आहे की, ते इचलकरंजी येथे सुत कापड माल खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. प्रतिवादी यांनी त्यांचे सोबत वेळोवेळी सुत खरेदीचे व्यवहार केलेले असून प्रतिवादी यांनी त्यांच्याकडे तशा रक्कमा ही दिलेल्या आहेत. प्रतिवादी यांचा दिनांक १/४/२०१५ ते ३१/३/२०१६ चा खाते उतारा वादीने हजर केलेला आहे. प्रतिवादीचा जमा खर्चाचा व्यवहार अकाऊटंट मनमोहन बोहरा (वा.सा.क्र.२) पाहत होता. खाते उता-यातील नोंदी ह्या मनमोहन बोहरा हे करत होते. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दिनांक १.४.२०१६ ते ३१.३.२०१७ अखेरचा खाते उतारा निशाणी क्र. ३९ लगत आहे. त्या खाते उता-याचे संगणकीय प्रमाणपत्र नि.क्र.४० लगत आहे. तसेच दिनांक १.४.२०१७ ते ३१.३.२०१८ अखेरचा खाते उतारा निशाणी क्र. ४१ व त्या सोबतचे प्रमाणपत्र नि.क्र. ४२ लगत आहे.

९. वादीचे पुराव्यात पुढे असे आले आहे की, दिनांक १४.८.२०१७ रोजी रक्कम रुपये ९,९०,९९७/- इतकी येणे बाकी होती. त्यावेळी प्रतिवादीने भारतीय स्टेट बँक शाखा- हातकणंगले या बँकेचे दिनांक १४.८.२०१७ रोजीचे

चेक नं. ४१३९६३ ते ४१३९६५ अखेरचे तीन चेक रक्कम रुपये ९,९०,९९७/- चे वसुली पोटी दिले होते. चेक नं. ४१३९६३ दिनांक १४.८.२०१७ हा रक्कम रुपये ५,३४,०७३/- चा होता. सदर चेकवर प्रतिवादी रोहन याची सही आहे. तो चेक दिनांक १४.८.२०१७ रोजी इचलकरंजी येथील एच.डी.एफ.सी. बँकेत जमा केला असता दिनांक १६.८.२०१७ चे 'अकाऊंट क्लोज्ड' या शे-याने न वटता परत आला. त्यानंतर प्रतिवादी विरुध्द फौजदारी केस नं. १७००/२०१७ दाखल केली.

१०. तसेच भारतीय स्टेट बँक शाखा- हातकणंगले या बँकेचा चेक नं. ४१३९६४ दिनांक १४.८.२०१७ हा रक्कम रुपये ३,३३,९७०/- चा होता. सदर चेकवर प्रतिवादी रोहन याची सही आहे. तो चेक दिनांक १४.८.२०१७ रोजी इचलकरंजी येथील एच.डी.एफ.सी. बँकेत जमा केला असता दिनांक १६.८.२०१७ चे 'अकाऊंट क्लोज्ड' या शे-याने न वटता परत आला. त्यानंतर प्रतिवादी विरुध्द फौजदारी केस नं. १६९८/२०१७ दाखल केली.

११. तसेच भारतीय स्टेट बँक शाखा- हातकणंगले या बँकेचा चेक नं. ४१३९६५ दिनांक १४.८.२०१७ हा रक्कम रुपये १,२२,९५४/- चा होता. सदर चेकवर प्रतिवादी रोहन याची सही आहे. तो चेक दिनांक १४.८.२०१७ रोजी इचलकरंजी येथील एच.डी.एफ.सी. बँकेत जमा केला असता दिनांक १६.८.२०१७ चे 'अकाऊंट क्लोज्ड' या शे-याने न वटता परत आला. त्यानंतर प्रतिवादी विरुध्द फौजदारी केस नं. १६९९/२०१७ दाखल केली.

१२. प्रतिवादी यांनी दिलेले चेक न वटता परत आले नंतर वादीने वकिलांचे मार्फत नोटीसा दिल्या होत्या. त्या नोटीसा प्रतिवादीने दिनांक ४.९.२०१७ रोजी स्विकारल्या आहेत. त्यानंतर प्रतिवादीने वादीस चेकच्या रक्कमा न दिलेने फौजदारी प्रकरणे दाखल केली. प्रतिवादी हे वादीस कायदेशीर देणे

लागतात. वादीने दाखल केलेल्या खाते उतारा-यावरुन दिनांक १४.८.२०१७ रक्कम रुपये ९,९०,९९७/- तसेच दिनांक १५.८.२०१८ पासुन ते ११.३.२०१९ पर्यंत द.सा.द.शे. १८ टक्के व्याज दराने होणारी व्याजाची रक्कम रुपये २,४०,८५३/- व नोटीस खर्च रुपये ३०००/- असे प्रतिवादीकडून एकूण रक्कम रुपये १२,३४,८५०/- इतकी येणे बाकी आहे.

१३. प्रतिवादीच्या वतीने वादीचा उलटतपास घेणेत आला. त्यामध्ये प्रतिवादी विरुध्द फौजदारी केस नं. १६९८/२०१७, १६९९/२०१७ व १७००/२०१७ अशी तीन प्रकरणे प्रलंबित आहेत हे वादीने मान्य केले आहे. वादीस प्रतिवादीकडून त्यांचे भारतीय स्टेट बँकेतील खाते वरुन रक्कम रुपये १३,३१,९४०/- व देना बँकेच्या खातेवरुन रक्कम रुपये २,००,१७५/- वादीस प्राप्त झाले आहेत ही बाब वादीने नाकारली आहे. तसेच वादीकडे प्रतिवादीची रक्कम रुपये १२,५४,७९८/- एवढी रक्कम जादा आली आहे ही बाब देखील वादीने नाकारली आहे.

१४. वादीने त्याच्या वतीने मनमोहन (वा.सा.क्र.२) याची साक्ष नोंदविली आहे. त्याचे पुराव्यात असे आले आहे की, वादी फर्म मध्ये तो गेल्या ९ वर्षांपासुन अकाऊंटंट म्हणुन काम करत आहे. वादीचे सर्व व्यवहारांचे, जमा खर्चाचे व संगणकीय नोंदीचे काम तो पाहतो असे त्याने सांगितले आहे. निशाणी क्र.३७ ते ४२ लगत खाते उतारे व प्रमाणपत्रे हजर केली आहेत. सदर साक्षीदाराचा प्रतिवादीकडून उलटतपास घेणेत आलेला नाही.

१५. प्रतिवादीकडून वादीस दिनांक ११.३.२०१९ अखेर रक्कम रुपये १२,३४,८५०/- येणे बाकी आहे ही बाब वादीने शाबीत केली आहे. याउलट, प्रतिवादीने वादीसोबत झालेल्या व्यवहारापोटी प्रतिवादीने वादीस जादा रक्कम अनावधानाने दिली आहे ही बाब प्रतिवादीने शाबीत केलेली नाही. त्यामुळे,

प्रतिवादी हा नुकसान भरपाई म्हणुन वादीकडून रक्कम रुपये १०,०००/- मिळणेस पात्र नाही. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये झालेल्या व्यवहारांमधुन प्रतिवादीकडून वेळेत न येणा-या रक्कमेवर १८ टक्के व्याज दाराने व्याज देणेचे प्रतिवादीने मान्य केले होते असे वादीचे पुराव्यात आले आहे. सदरची बाब प्रतिवादीने पुरावा देऊन नाकारलेली नाही अगर प्रतिवादीने तसे शाबीत केलेले नाही. त्यामुळे, वादी हा मागणीप्रमाणे प्रतिवादीकडून रक्कम रुपये १२,३४,८५०/- व त्यावर दावा दाखल तारीख १.४.२०१९ पासुन द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याज वसुल होऊन मिळणेस पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ ते ३ व ६ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्रमांक ४ व ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक ७ करिता -</u>

१६. वादीने प्रतिवादीकडून रक्कम रुपये १२,३४,८५०/- दिनांक ११.३.२०१९ अखेर येणे बाकी आहे ही बाब पुराव्या अंती शाबीत केली आहे. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १८८१ चे कलम १३८ प्रमाणे केसीस दाखल झाल्या होत्या. ही बाब पुराव्यावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे, वादी हा त्याचे मागणीप्रमाणे प्रतिवादीकडून रक्कम रुपये १२,३४,८५०/- व त्यावर दावा दाखल तारीख १.४.२०१९ पासुन द.सा.द.शे. १८ टक्के दराने व्याज वसुल होऊन मिळणेस पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्रमांक ७ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. दावा खर्चासह मंजुर करणेत येत आहे.

२. प्रतिवादीने वादीस रक्कम रुपये १२,३४,८५०/– व त्यावर दावा दाखल तारखेपासुन द.सा.द.शे. १८ टक्के दराने होणारे व्याज रक्कम पुर्ण वसुल होईपर्यंत द्यावे.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2026.07.13
16:53:30 +0530

दिनांक - १३.७.२०२६.

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.